**नगर परिषद मलकापूर जि.बुलढाणा**

**दि.08/04/2022 प्रशासकीय सभेचे कार्यवृत्त**

**1श्री.प्रभाकर दत्तू राणे,बुलडाणा यांचे 4.5 दलघमी क्षमतेच्या जलशुध्दीकरण क्षमतेच्या जलशुध्दीकरण क्षमतेच्या कामास व अतुल इंजिनियरिंग सर्विसेस यांचे टाकी पाडणे व किरकोळ कामास 6 महिने मुदतवाढ देणेबाबत प्राप्त पत्रावर योग्य तो निर्णय घेणे.**

श्री.प्रभाकर दत्तू राणे यांना MNP/WS/2615/2019दिनांक 11/09/2019 ला आदेश देण्यात आला असून कामाची मुदत 18 महिने होती.काम दिनाक 11/3/2022 रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते परंतु सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय,मुंबई यांचे आदेशानुसार COVID-19 विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी र ाज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक13 मार्च 2020 पासून लागू करण्यात आला असून त्यात नागरिकांच्या हालचाली रोखण्यासाठी नियम लागू करण्यात आले असून त्यात कंत्राटदार यांना कामासाठी मनुष्य बळ उपलब्ध होऊ शकले नाही तसेच वाहतूक व्यवस्था बंद असल्यामुळे माल मिळण्यास विलंब झाला.कामाचे ठिकाणी जवळ COVID रुग्ण आढळून आल्यामुळे सदर भाग प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले होते.त्यामुळे कंत्राटदार यांना सदर क्षेत्रात काम करता आले नाही.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक कं.संकीर्ण 1020/प्र.क्र.100/2020 व्यय-12,मंत्रालय,मुंबई दिनांक 29-07-2020 तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्रं.संकीर्ण 1020/प्र.क्रं.100/2020 व्यय-12 मंत्रालय मुंबई दिनांक 14/10/2020 या मध्ये नमूद तरतुदीनुसार कोरोना साथीच्या प्रादुर्भावमुळे कंत्राटदार यांना निर्माण होणाऱ्या अडचणीबाबत कंत्राटदार यांनी मुदत वाढ मागणी केल्यास त्यांना 6 महिने मुदतवाढ देण्याबाबत व कोणतीही दंडात्मक कार्यवाही न करण्याबाबत कळविले आहे.

कंत्राटदार यांचे काम बऱ्याच प्रमाणात झालेले असून किरकोळ कामे व सदर योजनेची TRIAL &RUN हा भाग विद्युतीकरण अभावी प्रलंबित आहे.श्री अतुल इंजिनियरिंग सर्विसेस यांचे कडे दोन पाण्याची टाकी बांधणे व जुनी टाकी पाडणे काम देण्यात आलेले असून त्यात किरकोळ कामे व टाकी पाडणे काम प्रलंबित आहे. नविन टाकी कार्यान्वीत झाल्याशिवाय जुनी टाकी पाडणे शक्य नसल्यामुळे तसेच जुन्या टाकीची वितरण व्यवस्था नविन टाकीवर शिफ्ट करणे गरजेचे होते या कामासाठी त्यांना किमान 7ते 10 दिवस ब्रेक डाऊन गरजेचा असून तो शहरात पाण्याची पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे शक्य झाले नाही. नगर पालिका मलकापूर येथे माहे सप्टेंबर 2020 पासून पाणी पुरवठा अभियंता हे पद रिक्त असून कंत्राटदार यांना धोरणात्मक निर्णय घेता येणे शक्य झाले नाही त्यामुळे कामास विलंब झाला आहे.कोविड-19 प्रादुर्भाव पाहता व तांत्रिक अडचणी पाहता त्यांना 6 महिने (सप्टेंबर 2022) पर्यंत मुदतवाढ देणे योग्य राहिल अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता व मुख्याधिकारी यांनी सादर केली आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून श्री.प्रभाकर दत्तू राणे,बुलडाणा यांचे 4.5 दलघमी क्षमतेच्या जलशुध्दीकरण क्षमतेच्या जलशुध्दीकरण क्षमतेच्या कामास व अतुल इंजिनियरिंग सर्विसेस यांचे टाकी पाडणे व किरकोळ कामास 6 महिने मुदतवाढ देण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**2- मलकापूर शहरातील वितरण व्यवस्थेत किरकोळ बदल करणे.**

मलकापूर शहरात 2020-2021 या कालावधीत मोठया प्रमाणात दाब वाहिनी टाकण्यात आलेल्या असून बऱ्याच भागात सदर पाईपलाईन शी अंतर्गत गल्ल्या जोडण्यात आलेल्या नाही आहे.सदर अंतर्गत

गल्ल्या त्या दाब वाहिनीस जोडल्यास नागरिकांना उच्च दाबाने पाणी पुरवठा होऊ शकतो.तरी खालील ठिकाणी कामे करणे गरजेचे आहे.

1.गांधी नगर भागात 10 इंची पाईपलाईन ला पिवाल यांची गल्ली जोडणे.

2.नसवाला चौक ते आर.एस.पाटील 10 इंची पाईपलाईन ला 5 गल्ली जोडणे.

3.संचेती गल्ली 10 इंची पाईपलाईन ला जोडणे.

4.ताजनगर भागात दोन गल्ल्या 10 इंची ला जोडणे.

5.सुरज मेडीकल गल्ली मेन लाईनला जोडणे.

6.इदगाह भागातील 1 गल्ली 8 इंची ला जोडणे

7.10 इंची पारपेठ लाईन ला कासम पहेलवान गल्ली ला जोडणे.

8.मुश्ताक अली नगर एक झोन 8 इंची जुनी इदगाह लाईन ला जोडणे.

उपरोक्त कामे 15 वा वित्तआयोग /न.प.निधी /प्राप्त अनुदानातून करण्यात यावी अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,मुख्याधिकारी यांनी सादर केली आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून 1 ते 8 गल्ल्या मुख्य दाबवाहिनीस जोडण्यास तसेच सदरचे कामे15 वा वित्तआयोग /न.प.निधी /प्राप्त अनुदानातून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**3-शिवाजी नगर प्रभागात महालक्ष्मी किराणा ते पानकर 4 इंची पीवीसी पाईपलाईन टाकणे व जुनी सिमेंट पाईपलाईन काढणे.**

शिवाजी नगर प्रभागात महालक्ष्मी किराणा ते पानकर 4 इंची पीवीसी पाईपलाईन टाकणे व जुनी सिमेंट पाईपलाईन काढणे बाबत सदर प्रभागातील नागरिक श्री.चंद्रकांत साळुंके यांचे निवेदन प्राप्त झाले असून पाहणी केली असता तेथे 30 वर्ष जुनी सिमेंट पाईपलाईन असून त्यामुळे नागरिकांना कमी दाबाने पाणी पुरवठा होत असून पीवीसी पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे.सदर ठिकाणी भविष्यात रस्ता होणार असून काम करण्यासाठी रस्ता फोडणे योग्य होणार नाही तरी 15 वा वित्त आयोग अथवा न.प.निधीतून सदर काम करणे योग्य राहिल.अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,मुख्याधिकारी यांनी सादर केलेल्या टिप्पणीत नमूद केले आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून शिवाजी नगर प्रभागात महालक्ष्मी किराणा ते पानकर 4 इंची पीवीसी पाईपलाईन टाकणे व जुनी सिमेंट पाईपलाईन काढण्यास तसेच सदर चे काम 15 वा वित्त आयोग अथवा न.प.निधीतून करण्यास व येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**4.नगर परिषद,मलकापूर येथे खंडोबा चौक ते तहसील चौक नविन पीवीसी पाईपलाईन टाकणे.**

खंडोबा चौक परिसरात दुसऱ्या सेंकड मेन पाईपलाईन वरुन पाणी पुरवठा केल्या जात असून सदर पाईपलाईन ही सार्वजनिक बांधकाम विभाग मुक्ताईनगर डांबरी रोड खाली असून तिला मोठया प्रमाणात गळती लागलेली असून सदर गळती बंद करण्यासाठी सदर रोड वर ट्राफिक वळती करुन काम करावे लागेल.तरी सदर गळती दुरुस्ती करण्यासाठी वारंवार रोड फोडण्याची परवानगी घेणे व ट्राफिक वळती करणे नगर पालिकेला परवडणारे नसून सदर ठिकाणी नविन पीवीसी पाईपलाईन टाकण्याबाबत माजी पाणी पुरवठा सभापती तथा गटनेते श्री.राजेंद्र वाडेकर यांनी पत्राद्वारे कळविले असून सदर काम केल्यास

केल्यास पाण्याचा मोठा अपव्यय कमी होईल तरी सदर काम 15 वा वित्त आयोग निधीतून करण्यात यावे अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,मुख्याधिकारी यांनी नमूद केले आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून मलकापूर हद्यीतील खंडोबा चौक ते तहसील चौक नविन पीवीसी पाईपलाईन टाकण्यास व सदरचे काम 15 वा वित्त आयोग निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे..

**5.मलकापूर शहर पाणीपुरवठा भविष्यातील पाणी टंचाई बाबत विविध उपाय योजना करणे.**

मलकापूर शहरात दर 3 वर्ष आड पाणी टंचाई निर्माण होत असून या पूर्वी वर्ष 2016,वर्ष 2019 मध्ये उन्हाळयात जलपात्रातील पाणी संपल्यामुळे टंचाईस सामोरे जावे लागले होते.हतनुर धरणातील पाणी पातळी 210 मीटर खाली गेल्यावर जॅकवेल मध्ये इनटेक वेल मध्ये येणारा पाणी पुरवठा खंडीत होतो या वर्षी दिनांक 23 मार्च 2022 रोजी पाणी पातळी 212.50 मीटर एवढी आहे तरी पाणी पातळी कमी झाली किंवा पाणी संपल्यास खालील प्रमाणे उपाययोजना करणे योग्य राहिल.

1. पावसाळयापूर्वी जॅकवेल मधील गाळ काढणे.
2. नदीपात्रात चारी मारुन मृत पाणी साठा उचल करणे.
3. नदीपात्रात तरंगते पंप टाकणे.
4. मृत साठा उचल करण्यासाठी आवश्यक त्या मौटार व साहित्य खरेदी करणे.पाणी टॅंकर द्वारे शहरात पाणी पुरवठा करणे.
5. पाणी टॅंकर द्वारे शहरात पाणी पुरवठा करणे.
6. मौजे वाकोडी ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून पाणी पुरवठा घेणे व त्यांचे विद्युत देयक अदा करणे.
7. वाकोडी पाईपलाईन दुरुस्ती करणे.
8. नळगंगा पंपींग स्टेशन दुरुस्ती करणे व कंत्राटी पध्दतीने चालविणे.
9. हातपंप,विंधन विहीर दुरुस्ती करणे,त्यावर मोटार बसविणे व नविन मागणी प्रस्ताव सादर करणे.
10. शहरातील पाणी असलेल्या विहीर गाळ काढणे व दुरुस्ती करणे.
11. शहरातील मुख्य पाईपलाईन ,वितरण व्यवस्थेतील मोठया गळती बंद करणे.
12. धुपेश्वर येथील सक्शन पाईप लांबी वाढविणे.
13. धुपेश्वर एयर व्हाल गळती 100 टक्के बंद करणे.
14. सेटलिंग टॅंक,प्युअर वाटर संप,क्लारीफायर मधील गाळ काढणे.
15. पंपींग स्टेशन दुरुस्ती करुन दोन्ही पंप अद्यावत करणे व किरकोळ कामे करणे.
16. शहरातील पाणी पूरवठा प्राधान्याने करुन हद्यी बाहेरील पाणी पूरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद करणे.
17. विशेष अवैध नळ कनेक्शन बंद मोहीम राबविणे.
18. खाजगी विंधन विहीर जलस्त्रोत अधिग्रहीत करणे.

तरी उपरोक्त कामांचे नियोजन टंचाई पूर्वी करणे आवश्यक असून त्याचा खर्च 15 वा वित्त आयोग,पाणी टंचाई निधी अथवा न.प.निधीतून सदर कामे करणे योग्य राहिल अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता,मुख्याधिकारी यांनी सादर केली आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेता अनु क्रं.1 ते 18 ची कामांचे टंचाईपूर्वी करणे आवश्यक असल्याने अनु क्रं.1 ते 18 ची कामे करण्यास व त्याचा खर्च 15 वा वित्त आयोग,पाणी टंचाई निधी अथवा न.प.निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे

**6. शाश्वत विकास ध्येय या योजनेंतर्गत शाश्वत विकासाची ध्येये क्रमांक 3,5,6 साध्य करण्यासाठी मलकापूर नगरपालिका पिण्याचे पाणी शुध्दीकरण माक्रोस्ले संयुग वापरुन निर्जंतुकीकरण करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत.**

संयुक्त राष्ट्र संघाच्या रीओ दी जेनेरीओ येथे जून 2012 मध्ये झालेल्या परिषदेत 17 शाश्वत विकास ध्येय व 169 लक्ष्य निश्चित करण्यात आलेली आहेत.महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (सभा घेणे) (सुधारणा)नियम 2018 च्या परिच्छेद 12(2) अन्वये अशी योजना तयार करताना जिल्हा नियोजन समिती,वित्तीय सुधारणा नुसार जिल्हा वार्षीक योजना मध्ये निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.शाश्वत विकास संपादित करण्यासाठी 1 टक्के निधी जिल्हा स्तरावर वार्षीक योजनेत राखीव ठेवण्याबाबत शासनाचे धोरण आहे.

सर्वांना शुध्द पाणी पुरवठा हे करणे हे शाश्वत' ध्येय असून त्यात शुध्दीकरण प्रक्रिया महत्त्वाची असून त्यात मायक्रोस्ले हे उत्पादन पाणी निर्जुंतुकिकरण हे वापरल्या जात आहे याचा वापर पुणे महानगरपालिका,लोणावळा नगर परिषद ,लोणंद नगर परिषद व इतर बऱ्याच नगर पालिका करीत आहेत.ब्लिचिंग पेक्षा त्याचा प्रभाव चांगला त्याला लागणारा खर्च ब्लिचिंग पेक्षा कमी आहे.

तरी सदर रसायन खरेदी प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी कळविले असून त्वरीत प्रस्ताव सादर करणे व तांत्रिक मंजूरी घेणे योग्य राहिल अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता व मुख्याधिकारी यांनी सादर केली आहे.

ठरविण्यात येते की,वरील सर्व बाबी विचारात घेवून शाश्वत विकास ध्येय या योजनेंतर्गत शाश्वत विकासाची ध्येये क्रमांक 3,5,6 साध्य करण्यासाठी मलकापूर नगर पालिका पिण्याचे पाणी शुध्दीकरण माक्रोस्ले संयुग वापरुन निर्जंतुकीकरण करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यास व तांत्रिक मंजूरी घेण्यास तसेच त्यादृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**7. नगर परिषद मलकापूर 4.5MLD क्षमता जलशुध्दीकरण केंद्र व धुपेश्वर अशुध्द पाणी उपसा स्टेशन येथे वाढीव विद्युत भार मंजूर करण्याबाबत व अनुंषंगिक कामे करण्याबाबत**

वैशिष्टयपूर्ण निधी अंतर्गत मलकापूर शहरात 4.5MLD क्षमता जलशुध्दीकरण केंद्र काम अंतिम टप्यात असून सदर ठिकाणी प्लांट कार्यान्वीत होण्यासाठी तेथे स्वतंत्र विद्युत भार मंजूर करणे व मौजे धुपेश्वर येथे सुध्दा एकाच वेळी

दोन पंप सुरु राहतील या दृष्टीने वाढीव विद्युत भार मंजूर करणे आवश्यक आहे.सदर भार मंजूर झ ाल्याशिवाय तेथील मशिनरी चाचणी घेणे शक्य होणार नाही मौजे धुपेश्वर येथे आज रोजी 110 KWलोड मंजूर असून 150 HPदोन पंप साठी 300KW लोड मंजूर करणे आवश्यक आहे.

तरी सदर कामे नविन प्लांट कार्यान्वीत होण्यासाठी करणे गरजेचे असून त्याचे अंदाज पत्रक MSEBयांचे कडून तयार करुन काम करणे आवश्यक आहे.सदर काम 15 वा वित्त आयोग मूलभूत

अनुदान किंवा वैशिष्टये पूर्ण निधीतून करणे आवश्यक आहे.अशी टिप्पणी पाणी पुरवठा अभियंता व मुख्याधिकारी यांनी सभेसमोर सादर केली

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेवून नगर परिषद मलकापूर 4.5MLD क्षमता जलशुध्दीकरण केंद्र व धुपेश्वर अशुध्द पाणी उपसा स्टेशन येथे वाढीव विद्युत भार मंजूर करणे व अनुंषंगिक कामे करण्यास व त्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास तसेच सदरचे काम सदर काम 15 वा वित्त आयोग मूलभूत अनुदान किंवा वैशिष्टये पूर्ण निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**8 नगर परिषद,मलकापूर मौजे धुपेश्वर पंपींग स्टेशन येथील पंपींचे सक्शन पाईप बदलणेबाबत**.

धुपेश्वर पंपींग स्टेशन येथे अशुध्द पाणी उपसा पंपाचे सक्शन पाईप हे बारमाही पाण्यात बुडलेले असून पाण्यातील क्षार मुळे ते जंगलेले झाले असून त्यांना बारीक छिद्र सुध्दा पडलेले आहेत.सदर पाईप बदलणे गरजेचे असून तो वेळेवर उपलब्ध न झाल्यास शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी सदर पाईप बदलण्यात मंजूरी देण्यात यावी काम अति आवश्यक असल्यामुळे काम त्वरीत करणे गरजेचे आहे. अशी टिप्पणी पाणीपुरवठा अभियंता व मुख्याधिकारी यांनी सादर केली आहे.

ठरविण्यात येते की, वरील सर्व बाबी विचारात घेवून मौजे धुपेश्वर पंपींग स्टेशन येथील पंपींचे सक्शन पाईप बदलणे अत्यंत आवश्यक असल्याने सदरचे काम करण्यास तसेच सदरचे काम 15 वा वित्त आयोग अथवा वैशिष्टयपूर्ण निधी न.प.निधीतून करण्यास ही सभा मंजूरात देत आहे.

**(आर.यु.सुरडकर)**
**प्रशासक,**
**नगर परिषद,मलकापूर**